# पंडित जवाहरलाल नेहरू यांचा लोकशाही समाजवाद एक : राजकिय विश्लेषण

– प्रा. डॉ. एल. बी. डोंगे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर, जि. नांदेड.

पंडीत जवाहरलाल मोतीलाल नेहरू समाजवादी लोकशाही परंपरेस बळकट करणारे, राष्ट्र आणि राज्यघटनेच्या धर्मनिरपेक्ष चरित्रास मजबुत स्थायी भाव प्रदान करणारे, परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार आणि मिश्र अर्थव्यवस्था विविध योजनांच्या माध्यमातून राष्ट्रीय करणाचे धोरण राबविणारे एक जागतिक किर्तीचे नेते होते. त्यांनी भारतीय समाजवादाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. दारिद्र्य निर्मुलन हा महत्त्वाचा मुद्दा नेहरुंसाठी होता. गरिबी, बेरोजगारी, मागासलेपण हे नष्ट करण्यासाठी समाजवाद हा एकच मार्ग आहे असे त्यांनी सांगितले होते. स्वातंत्र्य चळवळीचे सेनानी होते, एक सुखी संपन्न कुटूंबात त्यांचा जन्म झाला असलातरी त्यांनी राष्ट्रीय हितासाठी १९२१ ते १९४५ या २३ ते २४ वर्षात एकूण नऊ वर्ष तुरुंगात होते. त्यांचे संपूर्ण कुटूंबच स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभागी होते.

नेहरूवर इंग्लंडमधील फेबीयन समाजवादाचा मोठा प्रभाव होता. युरोप खंडात उदय झालेले आधुनिक मुल्ये, स्वातंत्र्य, समता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही समाजवाद, विज्ञाननिष्ठा या मुल्यांचा स्वीकार केला. रशियातील नियोजित अर्थव्यवस्थेचा त्यांच्यावर प्रभाव होता. सार्वजनिक क्षेत्राच्या विकासाच्या प्रारुपामुळे ते प्रभावीत झालेले होते. भारतीय स्वातंत्र्याच्या सुरूवातीच्या काळात धार्मीक द्वेषाच्या जखमा मागास अर्थव्यवस्था, रुढीवादी, परंपरावादी संरजामी मानसिकता असलेल्या समाजात लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टीकोन हे मोठे अवघड आव्हान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या समोर होते. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पंधरा वर्षात तो पाया मजबुत केला म्हणुनच भारत हा स्वातंत्र्यानंतरच्या अनेक दशकानंतर महासत्ता म्हणुन एक मोठे लोकशाही समाजवादी राष्ट्र म्हणून समोर येत आहे.

विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टीकोन हे त्यांच्या लोकशाही समाजवादाच्या विचाराचे प्रमुख सुत्रे होते. १९५८ मध्ये देशाचे विज्ञान धोरण जाहीर केले. त्यामुळे संपूर्ण देशात विज्ञान संस्थेचे जाळे निर्माण झाले. आजच्या वैज्ञानीक प्रगतीचे क्षेत्र नेहरू यांना द्यावे लागेल.

शास्त्रीय संशोधनाबरोबरच विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण प्रशिक्षण प्रचार-प्रसार याला महत्त्वपूर्ण मानले. भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा कणा आहे. हे ओळखुन भारतातील हरितक्रांतीला तसेच शेतीच्या आधुनिकीकरणाची योजना नेहरुंनी मांडली.

आर्थिक धोरणामध्ये नियोजन, मिश्र अर्थ व्यवस्था, आणि भांडवली वस्तु निर्मीती करण्यावर त्यांनी अधिक भर दिला हे त्यांच्या आर्थिक धोरणाचे सुत्र होते.

आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्रज्ञ डॉ.पी.सी.महाल लिबनिस यांच्या सहकार्याने त्यांनी नियोजन मंडळाची स्थापना केली. आर्थीक विकासासाठी आंतरराष्ट्रीय बाजारावर अवलंबुन न राहता राष्ट्राच्या अग्रक्रमानुसार प्रगतीची ध्येय-धोरणे व मार्ग निश्चित करण्यासाठी नियोजन मंडळाकडून पंचवार्षीक योजना तयार करण्याचे महत्त्वाचे कार्य पंडीत नेहरू यांनी केले. त्यामुळे सार्वजनिक उद्योगांचा पाया घालणारे पंडीत जवाहर नेहरु हे भारताचे पहिले पंतप्रधान ठरले.

दुर्गापूर, बोकारो, भिलाई या कारखान्याचे वर्णन नेहरुंनी आधुनिक देवालये असे केलेले दिसून येते नेहरूंच्या लोकशाही समाजवादी धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्थैर्य मिळालेले दिसून येते.

लोकशाही व धर्मनिरपेक्षता या मुल्यांची पायाभरणी नेहरुंनी घातली संसदेला व विरोधकांना त्यांनी कधीच कमी लेखले नाही. लोकशाही आधारस्तंभाना महत्त्वपूर्ण मानले. देशात लोकशाही समाजवाद रुजविण्याचे मोठे श्रेय त्यांनाच जाते.

**पंडित जवाहरलाल नेरुंचा लोकशाही समाजवाद :**

भारतीय समाजवादाच्या विकासात सर्वात अधिक योगदान पंडीत जवाहर नेहरु यांचे आहे. त्यांनी न केवळ समाजवादाचे भारतीय परिस्थितीनुसारच वर्णन केलेले नाही तर समाजवादी व्यवस्था निर्माण करण्यासाठी भरीव स्वरुपाचे कार्यदेखील केलेले आहे. लोकशाही समाजवाद विचारावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. दोन्ही संकल्पना ह्या एकमेकावर आधारीत मानत होते. सन १९२९ च्या लाहौर येथील अधिवेशनात अध्यक्षीय भाषनात त्यांनी स्पष्ट केले होते. कि मुझे इस बात को स्पष्ट स्वीकार कर लेना चाहिए कि मै समाजवाद और गणतंत्रवादी हूँ यदि भारत को अपनी निर्धनता और असमानता दूर करनी है तो उसे समाजवाद और लोकतंत्र का रास्ता अपनाना होगा, यद्यपि इसके लिए वह अपने तरीके निकाल सकता है और इस दर्शन को अपनी जाति की प्रतिभा के अनुकुल ढाल सकता है।

राजकिय क्षेत्रात त्याचा उदारमतवादी तत्त्वज्ञानावर पूर्ण विश्वास होता पण आर्थिक क्षेत्रामध्ये अहस्तक्षेपाच्या धोरणाचे समर्थक नव्हते. भारतीय समाजातील

आर्थिक समस्यांचे समाधान केवळ समाजवादातच आहे. असे त्यांना सुरवातीपासूनच वाटत होते. पंडीत जवाहर नेहरूंच्या मते राजकिय व आर्थीक सत्तेचे विकेंद्रीकरण तसेच बल प्रयोग न करता जनसहमतीच्या आधारावर स्थापन करण्यात आलेली व्यवस्था लोकशाही समाजवादी असेल.

१९३६ च्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषनात ते म्हणाले होते कि, समाजवाद एक आर्थिक सिद्धांत कि अपेक्षा कुछ जादा मायने रखता है। यह जिंदगीका दर्शन शास्त्र है और इसका यह रुप मुझे पसंद भी है। मै समाजवाद के सिवाय कोई दुसरा रास्ता नही देखना जो कि गरिबी, बेकारी, बेइज्जती और गुलामी से हिदुस्थान के लोंगो को छुटकारा दिला सके।

–(जैन पुरवराज डॉ.राजनिती विज्ञान : ३०० १९९२)

स्वातंत्र्यानंतर लोकशाही समाजवादाची सुरूवात पंडीत जवाहर नेहरू यांच्या नेतृत्त्वात केली. सर्वात प्रथम भारतीय राजघटनेअंतर्गत लोकशाही समाजवादाचा स्वीकार झालेला दिसून येतो. प्रस्तावना, राज्याची निती निर्देशक तत्त्वे आणि मुलभूत अधिकार यामध्ये लोकशाही समाजवादाचे दर्शन होते. पंचवार्षिक योजनेचा मुख्य उद्देश समाजवादाची स्थापना करने होता. ७ एप्रिल १९४८ रोजी ज्या आर्थीक धोरणाची घोषणा करण्यात आली ती मुख्यत: समाजवादामुळे प्रभावीत झालेली होती. ज्यामुळे अणुशक्ती, रेल्वे तसेच सहा प्रमुख उद्योगामध्ये शासनाला आपले वर्चस्व प्रस्थापित करता आले.

**१) समाजवादी व्यवस्थेचा संसदीय प्रस्ताव :**

सन १९५४ मध्ये केंद्रीय संसदेने सामुदायीक विकास योजनेचे लक्ष समाजवाद प्रस्तापीत करण्याचे ठरले. एक लोककल्याणकारी राज्य निर्माण करण्याचा संकल्प घोषीत केला. लोककल्यानकारी राज्य आणि समाजवाद व्यवस्था राष्ट्रीय योजनेचे दोन मुख्य उद्देश होते.

**२) आवडी अधिवेशन (सन १९५५) :**

भारतीय लोकशाही समाजवादाच्या प्रस्थापनेत आवडी येथील कॉंग्रेसचा प्रस्ताव महत्त्वपुर्ण मानल्या जातो. अधिवेशनामध्ये संविधानाची प्रस्तावना आणि नितिनिर्देशक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी योजनद्वारे (Socialisite Pattern of Society) ची स्थापना करण्यात यावी, ज्यामुळे उत्पादनाच्या प्रमुख साधनावर समाजाचे प्रभुत्व आणि नियंत्रण रहावे उत्पादनात वृद्धी व्हावी आणि राष्ट्रीय संपत्तीचे सार्वजनिक वितरण शक्य व्हावे. या प्रस्तावामध्ये खालील घटकावर भर देण्यात आला.

**अ) महत्त्वपूर्ण उद्योग व्यवसायावर समाजाचे नियंत्रण :** समाजवादी

व्यवस्थेमध्ये उत्पादनाच्या सर्व साधनांवर समाजाचे नियंत्रन असते पण भारत देशात मात्र सर्वच उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयकरण शक्य नाही. जो पर्यंत भारतातील सामाजिक परिस्थिती समाजवादासाठी पूर्ण अनुकूल होणार नाही. तो पर्यंत खाजगी उद्योगक्षेत्र व सार्वजनिक उद्योग हे दोन क्षेत्रांना प्रोत्साहन देण्यात येईल.

**ब) जमीन सुधारणा :** शेतजमीन सुधारणेचा आधार न राहता श्रम रहावा जमीन कसणाराच त्या जमीनीचा मालक राहावा. ग्रामीण क्षेत्राने कृषी क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान मिळवावे.

**क) उद्योगामध्ये कामगारांचा मोबदला :** उद्योग धंद्याच्या उत्पादनामध्ये कामगारांना देखील त्याचा हिस्सा दिला जावा केवळ पैसा हाच एकमेव आधार उद्योग धंद्यांचा न मानता श्रम हा घटक देखील खुप महत्त्वाचा आहे. कामगारांना त्यांच्या श्रमाचा एवढा मोबदला दिला जावा जेने करून त्यांच्या जीवन उदरनिर्वाह व्हावा तसेच ग्रामीण लघु उद्योग धंद्यांचा प्रोत्साहन दिल्या जावे.

औद्योगीक क्षेत्रात तिन घटकावर अधिक भर दिला जावा. त्यामध्ये अधिकाधीक उत्पादन अधिकाधिक लाभ, अधिकाधीक लोकांना काम, सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळावा.

**ड) सहकरीतेला प्रोत्साहन :** जनतेमध्ये सहकार्य आणि श्रमदानाच्या भावना बाबत जागृती करण्यात यावी. विकास योजनांच्या अंमलबजावणी सोबतच जनतेशी अधिक संपर्क प्रस्थापीत करावा हा मुख्य उद्देश होता.

**इ) सामाजिक न्याय :** जनतेमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ विषमता आणि अस्पृश्यतेची भावना नष्ट केली जावी. समाजवादी सहकारी राज्याची स्थापनेचा प्रस्ताव सन १९५६ ला नागपूर अधिवेशनात काँग्रेसने औपचारीक रुपात काँग्रेसच्या उद्देशाच्या रुपात आपल्या संविधानाचे कलम ०१ मधील शांतपूर्ण आणि न्यायोचीत साधनाद्वारे एक सामाजिक सहकारी राज्याची निर्मीती हा प्रस्ताव पास करण्यात आला. लोकतांत्रिक उपायद्वारे समाजवादाची स्थापना करणे ही भुमिका जवाहरलाल नेहरु यांची होती.

**३) भावनगर प्रस्ताव :**

जाने. १९६२ च्या कॉग्रेस अधिवेशनामध्ये पुन्हा एका लोकशाही समाजवादाची स्थापना प्रस्ताव संमत करण्यात आला. त्यामध्ये भारत में मुल समस्या जीवनस्तर को उठाना ही नही वरन उत्तरोत्तर सामाजिक और आर्थिक समानता की स्थापना करना है।

**४) जयपुर अधिवेशन :**

**१९६३ च्या** काँग्रेस जयपुर अधिवेशनात पंडीत जवाहर लाल नेहरु म्हणाले लोकतंत्रका अनिवार्य परिणाम समाजवाद है। राजनिती यदी आर्थिक लोकतंत्र,

सिमती नही है ता वह अर्थहीन है।

**५) भुवनेश्वर प्रस्ताव :**

९ जाने. १९६४ साली ६८ व्या काँग्रेस अधिवेशनात पुन्हा एकदा व्यापक स्वरूपात लोकशाही समाजवादाला राष्ट्रीय धोरणाचा आधार म्हणून स्वीकारण्यात आले. त्याचे उद्देश सांगण्यात आले.

आर्थिक विकास करण्यासाठी सर्वांना समान संधीची उपलब्धता करून देते. विशेषीकरणाच्या अधिकार नष्ट करण्यात यावे. राहणीमानाबाबत आणि विचारामध्ये नविन दृष्टीकोन तसेच नैतिकतेचा विकास करणे पंडीत जवाहरलाल नेहरूंच्या प्रयत्नामुळे लोकशाही समाजवादाच्या दिशेने अनेक योजना बनविण्यात आल्या तसेच त्यांची अंमलबजावणी देखील करण्यात आली.

संपूर्ण देशात सामुदायिक विकास कार्यक्रम राबविण्यात आला. विकास कार्यामध्ये जनतेचे सहकार्य मिळविणे तसेच राज्याच्या शक्तिचे विकेंद्रीकरण करणे यासाठी पंचायत राज्याची स्थापना करण्यात आली.

सामाजिक संरक्षण आणि श्रम क्षेत्रामध्ये देखील शासनाद्वारे विविध कायदे यांची निर्मीती करून कामगार कल्यानाच्या दिशेने कांही महत्वपूर्ण पावले उचलेली दिसून येतात.

**६) सत्ताधाऱ्यांच्या केवळ घोषणा :**

काँग्रेस पक्ष अखों का अन्य था सर्व राजकिय पक्षानी समाजवादी लोकशाहीचा केवळ नाराच दिलेला आहे. वार्षिक अधिवेशनात समाजवादी तत्वांची मोठ्या प्रमाणात घोषणा केली जाते. प्रस्ताव तसेच मोठ्याने नारे बाजी केल्या जाते पण त्यासाठी मोठे प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही.

**७) रोजगाराची समस्या :**

देशात मोठ्या प्रमाणात रोजगाराची समस्या आहे तसेच गरिब व श्रीमंत वर्ग यांच्यात देखील मोठी तफावत आहे. श्रीमंत वर्गाची जीवन जगण्याची शैली आरामदायी मौजेची आहे तर गरीब कुटूंबाची केवळ १०० रु. पूर्ण दिवस काम करून पूर्ण कुटूंबाचे पालन पोषण शक्य नसल्यामुळे अर्धपोटी उपाशी राहण्याची वेळ येत आहे. गरिब कामगार-मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणात शोषीत होत आहे. पूर्ण मतदान केले तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहे. कारण जो निवडून येत आहे तो केवळ स्वत:चे हितच बघत आहे. म्हणुन रोजगाराची समस्या आजही कायम आहे.

**८) राजकारणाचे गुन्हेगारीकरण :**

संविधान लागु झाल्यानंतर भावी पिढीला दिले गेलेल्या वचनाची परिपूर्णता

झाली नाही त्या दिशेने मोठे प्रयत्न करण्यात आले नाही. त्यामुळे देशातील राजकिय नेत्यांचे कर्तृत्वाच्या दृष्टीने नैतिक अधपतन होऊ लागले. त्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. समाजवादी लोकशाही प्रस्थापनेसाठी केवळ नारेबाजी न करता ठोस कार्य करने गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

लोकशाही समाजवादाची काही सैद्धांतीक आणि व्यवहारिक कमतरता आहे. वैचारिक स्पष्टतेचा अभाव आहे. भारतीय लोकशाही समाजवादाचा कोणताही एक जनक नसल्यामुळे प्रत्येक विचारवंताने आपल्या पद्धतीने समाजवादाची मांडणी केलेली दिसून येते.

भारत देशात ज्या प्रमाणात समाजवादाची स्थापना झाली पाहीजे. त्याप्रमाणात झालेली नाही. दृढसंकल्प प्रबळ इच्छाशक्ति आणि गतिशीलता गरजेची असते याचा मोठ्या प्रमाणात अभाव दिसून येतो. १९७७ सरदार पटेल स्मारक व्याख्यानमालेत संविधान आणि सामाजिक आर्थीक परिवर्तनावर भाषण करताना सर्वोच्च न्यायालयाचे भुतपूर्व न्यायाधिश डॉ.हंसराज खन्ना यांनी बरोबरच वक्तव्य केले होते. संविधान में जो सामाजिक आर्थिक लक्ष्य और उपदेश निर्धारित किए गये थे हम उनसे पहले की अपेक्षा अधिक दुर हो गए है। यह विडंबना ही है कि इन लक्ष्यों को प्राप्त करणे की दिशा में कुछ नही किया गया है। हे वास्तव समाजवादी भारताचे आहे हे नाकारता येणार नाही म्हणुन नेहरुंच्या संकल्पनेतला समाजवादी भारत निर्माण होवु शकला नाही.

**संदर्भ ग्रंथसूची :**


१. लुनिया वी. एन.- आधुनिक भारत का राजनैतिक एवम सांस्कृतिक इतिहास, १९९०, चतुर्थ, पृ.३९९
२. महाजन विद्याधर- आधुनिक भारत का इतिहास, १९९४, एस चंद एण्ड कंपनी लिमीटेड रामनगर, नई दिल्ली, पृ.७५६
३. जैन पुरवराज, डॉ. राजनीति विज्ञान, साहीत्यभवन, आगरा, १९९२, पृ.२९७
४. दैनिक हिदुस्थान, पृ.३, १८ डिसें. १९७७
५. मोठे भा. ल.- भारतीय राजकिय विचार, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, नागपूर, २००३.
६. डोळे ना. य.- प्रमुख भारतीय विचारवंत, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
७. पाटील संतोष- राजकिय विचारप्रणाली, शुभम प्रकाशन, लातूर, २००५